## कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३४ वी बैठक
## दिनांक २३.०४.२०२५ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग तसेच समितीचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सह-अध्यक्ष, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई** येथे ३४ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष, मा.सह-अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ.विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री.अक्षय गजभिये, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | श्रीमती आंचल गोयल, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय |
| ४. | डॉ.इंदु राणी जाखड, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.व्दारे) | जिल्हाधिकारी, पालघर कार्यालय |
| ५. | श्री. अनिल पाटील, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.व्दारे) | जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग कार्यालय |
| ६. | श्री.एस.एन.रेड्डी, भा.व.से. | उपवनसंरक्षक (व्ही.सी.व्दारे) | उपवनसंरक्षक (प्रा), सावंतवाडी यांचे कार्यालय |
| ७. | डॉ.अभय पिंपळकर | संचालक (व्ही.सी.व्दारे) | पर्यावरण विभाग, मुंबई |
| ८. | श्री. भाऊ गलांडे | अपर जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालय |
| ९. | श्री.सतीश बागल | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालय |
| १०. | श्री.चंद्रकांत सुर्यवंशी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालय |
| ११. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | कांदळवन विभाग, दक्षिण कोकण |
| १२. | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | कांदळवन विभाग, उत्तर कोकण |
| १३. | श्री.प्रदीप रा.तावरे | सहा.अधीक्षक, क्र. १ | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| १४. | श्रीमती उर्मिला पाटील | उपविभागीय अधिकारी | उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय |
| १५. | श्री.सुनिल जाधव | नायब तहसिलदार | उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय |
| १६. | डॉ.कैलास गायकवाड | उप-आयुक्त (परिमंडळ -२) | नवी मुंबई, महानगरपालिका |
| १७. | श्री.अवधूत तावडे | उप-आयुक्त | क.डो.म.पा |
| १८. | श्री.अभिजित भुजबळ | पो.नि. (सुरक्षा विभाग) | पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड |
| १९. | श्री.अजय वानखेडे | उपनियोजनकार | सिडको |
| २०. | श्री.राजेश पवार | का.अ. | नवी मुंबई, महानगरपालिका |
| २१. | श्री.स्टॅलिन डी | अशासकीय सदस्य | वनशक्ती |
| २२. | श्री.अनिल पंडीत | अशासकीय सदस्य | B.E.A.G. |
| २३. | श्री.ठाकरे | उपअधिक्षक (नमक) | उपआयुक्त (नमक) यांचे कार्यालय |
| २४. | श्री.वर्धन | स्थापत्य | उपआयुक्त (नमक) यांचे कार्यालय |
| २५. | श्री.राजमाने | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | ठाणे शहर, पोलीस यांचे कार्यालय |
| २६. | डॉ.पिताले | शास्त्रज्ञ | BNHS, मुंबई |
| २७. | राधिका फडके | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| २८. | श्री.एस आर कुलकर्णी | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| २९. | पोलीस अधिक्षक कार्यालय | ( व्ही.सी.व्दारे ) | पालघर |
| ३०. | श्री.प्रशांत रोडे | अतिरिक्त आयुक्त ( व्ही.सी.व्दारे ) | ठाणे, महानगरपालिका |
| ३१. | उपविभागीय अधिकारी | ( व्ही.सी.व्दारे ) | वसई |
| ३२. | आर. जे. गायकवाड | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| ३३. | रियाज शेख | ( व्ही.सी.व्दारे ) | - |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्याने वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| ·१ | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | |

| अ.क्र. | जिल्हा | शासकीय विभाग | क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदूर्ग | महसूल | ३४.५३ | व्हि.सी.व्दारे उपस्थित सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी उर्वरित ३४.५३ हेक्टर कांदळवन क्षेत्राचा ताबा वन विभागाकडे दोन महिन्यात देण्यात येईल असे सांगितले. |
| २. | पालघर | महसूल | १०१८.५८ | व्हि.सी.व्दारे उपस्थित पालघर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी १२७७.५८ हेक्टर पैकी ३१५ हेक्टरचा ताबा देण्यात आले असल्याचे सांगितले व उर्वरित ठिकाणी काही अतिक्रमणाचा विषय असून त्याबाबत सविस्तर आढावा घेऊन पुढील नियोजन करुन समितीस कळविण्यात येईल असे सांगितले. |
| ३. | रायगड | JNPA | ७०.३३ | या संदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी रायगड जिल्ह्यातील JNPA कडील ७०.३३ हेक्टर क्षेत्र हस्तांतरीत करणेबाबात JNPA च्या अधिका-यांशी चर्चा झालेली असून प्रथम ७०.३३ हेक्टर क्षेत्राचा वन विभागास ताबा देण्याची विनंती करण्यात आली आहे तसेच, Diversion करिता FCA Act अंतर्गत कांदळवन कक्षाकडे सादर करण्यात येणा-या प्रस्तावावार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ४. | ठाणे | महसूल व इतर | ४४७.६८ | यासंदर्भात, मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र रिमोट सेंन्सीग ऍप्लिकेशन सेंटर (MRSAC) या संस्थेकडील सन २००५ या कालावधीतील कांदळवन दर्शक नकाशे व कांदळवन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्या निरीक्षणाव्दारे काही कांदळवन क्षेत्र ठाणे जिल्ह्यातील इतर शासकीय / निमशाकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून वन विभागास (कांदळवन कक्ष) ४४७.६८ हेक्टर हस्तांतरीत करण्यासाठी शिल्लक असल्याचे पुनश्च बैठकीत सांगितले तसेच, त्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयास महसूल व इतर यंत्रणांकडून वन विभागास कांदळवन क्षेत्र हस्तांतरित करण्याबाबत दि. १३ फ़ेब्रुवारी, २०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे बैठकीत निर्देशनास आणून दिले व त्याप्रमाणे,महसूल, GoI, सिडको व इतर यंत्रणांना जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडून कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात असे निर्देश दिले. |
| ५. | मुंबई, शहर | महसूल व इतर | ६८.५० | यासंदर्भात, बैठकीत उपस्थित जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी वन विभागास २७६.६५ हेक्टर कांदळवन क्षेत्रापैकी २५३ हेक्टर कांदळवन क्षेत्र हस्तांतरित करण्यात आले असून उर्वरित **२३.६५** हेक्टर कांदळवन क्षेत्र सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यातील असल्याचे सांगितले. याबाबत, दि. ३ एप्रिल, २०२५ रोजी सॉल्ट पॅन विभागाबरोबर जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालमार्फत बैठक घेण्यात आली होती. वास्तविक सॉल्ट पॅन विभाग केंद्रीय वाणिज्य व उद्योग विभागाच्या अंतर्गत येते. या विभागाने त्यांची २०२४ मध्ये Internal Policy Guidelines तयार केलेल्या होत्या ज्यामध्ये वरील जागा विनामुल्य हस्तांतरीत करण्याबाबत परवानगी नव्हती त्याकरिता ते विशिष्ट आकारणी करत होते आता त्यांनी त्यांच्या Internal Policy Guidelines मध्ये बदल केले असून त्यामध्ये वरील प्रकारच्या जागा विनामुल्य हस्तांतरण करण्याबाबत निर्णय झालेला असल्याचे सांगितले. तसेच, उर्वरित २३.६५ हेक्टर सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रकरिता पाठपुरावा व संबंधित केंद्रीय विभागास पत्रव्यवहार करण्यात येईल असे सांगितले. त्याचप्रमाणे, मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचा दि. १३ फेब्रुवारी, २०२५ च्या पत्रातील ४४.८५ हेक्टर कांदळवन क्षेत्राची संयुक्त स्थळपाहणी (Joint Inespection) लावून त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले. |
| ६. | मुंबई, उपनगर | महसूल व इतर | २७५.१३ | यासंदर्भात, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालमार्फत संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना पडताळणी करण्याचे आदेश दिले असल्याचे मा.सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सांगितले. |
| | | एकूण | १९१४.७५ | |

<table>
<tr>
<td>२.</td>
<td>कोकण विभागातील सर्व (७) सागर तटीय जिल्ह्यातील समितीकडे Offiline पध्दतीने प्राप्त झालेल्या तक्रारींचा निपटारा करणेबाबत चर्चा.</td>
<td>मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी ऑफलाईन तक्रारींबाबत जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समित्यांनी त्यांचे अधिनस्त असणा-या जुन्या ऑफलाईन ४७ तक्रारींचे अवलोकन करुन तक्रारनिहाय कार्यवाहीचा पुर्नलागवड अहवाल विभागीय स्तरावरील समितीसमोर १० दिवसांत सादर करणेबाबत सूचना दिल्या. जेणेकरुन सदर तक्रारींचा निपटारा होणे शक्य होणार असल्याचे सांगितले.<br><br>
<table>
<tr><th>जिल्हा</th><th>ऑफ़लाईन प्रलंबित तक्रारी</th></tr>
<tr><td>ठाणे</td><td>१३</td></tr>
<tr><td>मुंबई उपनगर</td><td>१६</td></tr>
<tr><td>पालघर</td><td>९</td></tr>
<tr><td>रायगड</td><td>९</td></tr>
<tr><td>Total</td><td>४७</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>३.</td>
<td>Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणे व त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत चर्चा</td>
<td>यासंदर्भात, मा.सह- अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सर्व सदस्यांना Mangrove Suraksha App कशाप्रकारे हाताळावयाचे आहे. याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच, दि.१६.०३.२०२४ पासून Mangrove Suraksha App सुरु करणेत आले असून या ॲपवर तक्रारदार Online स्वरुपात तक्रार दाखल करतात व काही तक्रारी अजूनही Offline प्रकारामध्ये प्राप्त होतात त्यादेखील या ॲपवर कांदळवन कक्षामार्फत Upload केल्या जात असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे, दि.२२.०४.२०२५ अखेर Mangrove Suraksha App वर प्राप्त तक्रारीबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे.<br><br>
<table>
<tr><th>District</th><th>Total Complaint</th><th>Open Complaint</th><th>Close Complaint</th><th>Pending for giving date to site inspection</th><th>Pending for uploading site inspection report</th><th>Pending for uploading action taken report</th></tr>
<tr><td>Mumbai City</td><td>20</td><td>4</td><td>16</td><td>1</td><td>3</td><td>4</td></tr>
<tr><td>Mumbai suburban</td><td>205</td><td>49</td><td>156</td><td>1</td><td>49</td><td>49</td></tr>
<tr><td>Palghar</td><td>75</td><td>44</td><td>31</td><td>7</td><td>24</td><td>44</td></tr>
<tr><td>Raigad</td><td>83</td><td>23</td><td>60</td><td>1</td><td>12</td><td>23</td></tr>
<tr><td>Ratnagiri</td><td>6</td><td>1</td><td>5</td><td>1</td><td>1</td><td>1</td></tr>
<tr><td>Sindhudurg</td><td>14</td><td>2</td><td>12</td><td>2</td><td>2</td><td>2</td></tr>
<tr><td>Thane</td><td>242</td><td>53</td><td>189</td><td>0</td><td>45</td><td>53</td></tr>
<tr><td>Total</td><td>645</td><td>176</td><td>469</td><td>13</td><td>136</td><td>176</td></tr>
</table>
<br>
यासंदर्भात, अशासकीय सदस्य यांनी खराब झालेल्या कांदळवन क्षेत्राचे पुर्नलागवड करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असल्याचे सांगून मॅंग्रोव्ह सुरक्षा ॲपमध्ये निकाली काढण्यात आलेल्या तक्रारीं ह्या पुर्नलागवड प्रस्ताव अहवालाच्या अनुषंगानेच निकाली काढणे अपेक्षित असल्याचे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कांदळवन क्षेत्राशी निगडीत सर्व यंत्रणांनी पुर्नलागवड मार्गदर्शनाकरिता कांदळवन कक्षाशी समन्वय साधावा असे निर्देश दिले. तसेच, मॅंग्रोव्ह सुरक्षा ॲपवर एखादी नव्याने कांदळवन क्षेत्रात डेब्रिज भरावाबाबत तक्रार दाखल झाली असेल तर महसूल व संबंधित स्थानिक यंत्रणांनी त्यावर नुसता गुन्हा दाखल करुन तक्रार निकाली काढणे योग्य नसून त्या ठिकाणी १२ तासाच्या आत स्थळपाहणी होऊन त्या ठिकाणी आवश्यकता असल्यास त्वरीत पुर्नलागवड होणे गरजेचे असल्याचे सांगितले.</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>४.</td>
<td>मा. अध्यक्ष व मा.सह-अध्यक्ष यांनी मागील बैठकीत दिलेल्या सूचना.</td>
<td>या संदर्भात, मा. सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी डेब्रिज हटवण्याकरिता आवश्यक निधी कोणत्या स्त्रोतातून उपलब्ध करुन घेता येईल अथवा विभागीय स्तरावरील जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत निधी उपलब्ध होईल किंवा कसे ? याबाबत मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांच्याशी चर्चा अथवा बैठक घेऊन त्यानूसार सदर प्रस्ताव शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवण्यात येईल असे सांगितले.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा</th><th>कार्यवाही करणारी संबंधित यंत्रणा</th><th>संबंधित यंत्रणांकडून समितीस प्राप्त खर्चाचे अंदाजपत्रक कोटीत</th></tr>
<tr><td>१.</td><td>मुंबई, उपनगर</td><td>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय</td><td>रु. ७.५८ कोटी</td></tr>
<tr><td rowspan="2">२.</td><td rowspan="2">ठाणे</td><td>मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालय</td><td>रु. ७.१२ कोटी</td></tr>
<tr><td>ठाणे, महानगरपालिका यांचे कार्यालय</td><td>रु. ६४.०४ कोटी</td></tr>
<tr><td>३.</td><td>पालघर</td><td>जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय</td><td>रु. २५.११ कोटी</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>रु. १०३.८७ कोटी</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>५.</td>
<td>पोलिस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्हयामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा.</td>
<td>मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग व मा. सह-अध्यक्ष यांनी कांदळवन संरक्षणबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन पोलीस यंत्रणेमार्फत गुन्हे नोंदविले जातात त्यामध्ये किती गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेली आहे. या गुन्हाच्या तपासाबाबतची सद्यस्थितीबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या.</td>
</tr>
</table>

(एस.व्ही.रामाराव, भा.व.से.)
सह अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. विजय सूर्यवंशी, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त,कोकण विभाग